**औंदुबर कडलासकर वगैरे वि.**

**अर्जुन श्रीमंत कडलासकर वगैरे**

## आदेश निशाणी क्रमांक २५ वर

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विलंब माफ होवून मिळणेसाठी केलेला आहे.

२. वादींच्या मते, प्रतिवादी क्र. १ श्री. अर्जुन श्रीमंत कडलासकर हे दिनांक २९.०३.२०२२ रोजी मयत झालेले असून त्याची नोंद मौजे देवडे येथे ग्रामपंचायतच्या दप्तरी दिनांक २९.०३.२०२२ रोजी झाली. परंतु ग्रामसेवक हे गावी येत नसल्यामुळे प्रतिवादी क्र. १ चे मृत्यूप्रमाणपत्र मिळालेले नाही. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. १ च्या वारसांनी गांव कामार तलाठी देवडे येथे वारसांची नोंद लावणेकामी अर्जासोबत जोडलेल्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत प्राप्त करून घेतली. प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी ७६ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब जाणीवपूर्वक केलेला नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. १ चे वारस तसेच इतर प्रतिवादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र. १ च्या वारसांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले की, वादीचा अर्ज खरा व कायदेशीर नसून अर्जातील कारण चुकीचे आहे. वादी याने वारस आणणेस बराच विलंब केलेला आहे. वैकल्पीकरित्या अर्ज मंजुर करायचे झाल्यास वादींना १०००/- रूपयांची कॉस्ट आकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने सरस निरस मानाने वाटप होवून पृथ्थक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ हा दिनांक २९.०३.२०२२ रोजी मयत झालेला आहे.

प्रतिवादी क्र. १ च्या वारसांना रेकॉर्डवर आणणेसाठी ७६ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत निशाणी क्र. २६ सोबत अभिलेखावर दाखल केलेला आहे. तसेच, दाव्याचा निकाल गुणवत्तेवर लागणेसाठी प्रतिवादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे वादींचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादीने प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब रक्कम रूपये २००/- इतक्या खर्चावर माफ करण्यात येते.

३. खर्चाची रक्कम तालुका विधी सेवा समिती पंढरपूर यांना देण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

सही/-

दिनांक- १८/०४/२०२३
श्रीमती एस. ए. साळुंखे

ठिकाण- पंढरपूर
पाचवे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पंढरपूर

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M.P.Gheradi ( L. G.) |
| Court | :- | 4th Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | :- | 18.04.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 18.04.2023 |
| Judgment/Order uploaded on | :- | 20.04.2023 |